जा.क्र.नांवाशमनपा/निवड/ 480 /२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक 23/12/2025

:: जाहिर सुचना ::

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिध्दी

ज्याअर्थी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५, दिनांक २६.०६.२०२५ व पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक ०९.१२.२०२५ च्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम निवडणूक नियम १४ (१) अन्वये मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करण्यास निर्देश दिलेले आहेत.

त्याअर्थी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१ ते २० साठी दिनांक १५.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रभागनिहाय अंतिम मतदार यादीवरुन मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी दि.२०.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर यादीमधील प्रभाग क्र.०७ च्या मतदान केंद्राच्या ठिकाणांत अंशत: बदल झालेला असुन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.०७ च्या जनतेस सुचित करण्यात येते की, सुधारीत यादी माहितीसाठी व पाहण्यासाठी प्रभाग क्र.६, ७ व ८ साठी नियुक्त केलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी क्र.०३ यांच्या तळमजला, कामगार कल्याण भवन, लेबर कॉलनी, नांदेड येथील कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच उपरोक्त यादी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.nwcmc.gov.in वर, क्षेत्रीय कार्यालय क्र.३ व महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डवर पाहण्यास उपलब्ध आहे.

स्थळ -: नांदेड
दिनांक -: २४.१२.२०२५

स्वाक्षरीत/-
(डॉ महेशकुमार डोईफोडे)
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

F:\प्रेस नोट.doc

Scanned with OKEN Scanner